Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta. Sonpeth Dist. Parbhani

ISSN 2319 - 359X

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# IDEAL

Volume - IX Issue - II March - August - 2021

Marathi Part - II

Peer Reviewed Refereed and
UGC Listed Journal No. 47026

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.601
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Assit. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Math's), M.B.A. (Mkt), M.B.A (H.R),
M.Drama (Acting), M.Drama (Prod & Dirt), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

VOLUME - IX, ISSUE - II - MARCH - AUGUST - 2021
IDEAL - ISSN - 2319 - 359X - IMPACT FACTOR - 6.601 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - II



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १३ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्रियांबाबत सुधारणावादी कार्य<br>प्रा. कविता अशोक मोराडे | ५८-६० |
| १४ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार<br>के. एस. तिडके | ६१-६६ |
| १५ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आणि सामाजिक आशयाचे चित्रपट<br>लक्ष्मीकांत साळूबा जाधव | ६७-७० |
| १६ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक व सामाजिक सुधारणा विषयक विचार<br>प्रा. निखिल गणेश जगताप | ७१-७५ |
| १७ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कृषी विषयक विचार<br>प्रा. विनायक यशवंत वनमोरे<br>प्रा. डॉ. बाळासाहेब कोंडीबा माने | ७६-८१ |
| १८ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लोकशाही विषयक विचार आणि सद्यस्थिती<br>डॉ. सुनिता आत्माराम टेंगसे | ८२-८८ |
| १९ | भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संसदीय लोकशाही संबंधीचे विचार<br>डॉ. सोमवंशी मुक्ता (गंगणे) | ८९-९४ |
| २० | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अस्पृश्यता निवारणासंबंधी कार्य<br>प्रा. डॉ. अरूण मुकुंदराव शेळके | ९५-९९ |
| २१ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक समाज सुधारक<br>डॉ. अंभुरे एस. डी. | १००-१०४ |
| २२ | भारतीय संविधान आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>प्रा. डॉ. मोकळ प्रभाकर रामजी | १०५-१०८ |
| २३ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा लहान राज्याविषयीचा दृष्टीकोण<br>प्रा. सुभाष दामोदर | १०९-११३ |
| २४ | आरक्षण आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>प्रा. डॉ. बबिता येयले | ११४-११७ |



PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani



# २१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक समाज सुधारक

**डॉ. अंभुरे एस. डी.**
इतिहास विभाग, कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ.

## प्रस्तावना

विसाव्या शतकात भारतात समाजपरिर्वन करणारे जे समजा सुधारक होऊन गेले आहेत. अशा समाज सुधारकाच्या मालिकित आणि महाराष्ट्राच्या शिल्पकालांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकराची आदरीत गनना केली जाते.बाबासाहेब आंबेडकर पूर्व काळात अंधश्रध्दा, निरक्षरता, रुढी परंपरा, कर्मकांड इ. प्रचलित प्रथा होत्या.स्त्रीयांचे जीवन अतिशय वाईट झाले होते.संपूर्ण देशात अस्पृश्यासारखी अंत्यत कलंकमय पध्दत चालू झाली होती.अतिशुद्रास अस्पृश्य समजून त्याचा साधा स्पर्श सुध्दा विटाळ समजला जात असे.डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आधुनिक भारताचा इतिहास घडवणाऱ्या मध्ये श्रेष्ठ विभूती पैकी एक धर्मिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक इ. विषय वैचारिक व तात्वीक भुमिका इत्यादीचा अभ्यास केला तर त्यांना कोणत्या एका विषयात बथिरल करता येत नाही. कारण त्यांनी इतिहास, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, लोकप्रशासन, राज्यघटना, पत्रकारिता, धर्मचिकित्सा, व्यवस्थापन इ. चिंतन केले आहे.

## उददेश

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक विचाराचा आढावा घेणे.
2. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या समाजिक कार्याचा परिणाम,यांचा अभ्यास करणे.
3. 19 व्या शतकातील सामाजिक जीवनाचा अभ्यास करणे.
4. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कालीन महाराष्ट्रातील समस्या जाणून घेणे.
5. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कालीन समाज जीवनावर जातीत्मतेच्या समस्या जाणुन घेणे.

## गृहितके

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कालीन महाराष्ट्रात सामाजिक जीवनात अनेक समस्या होत्या.
2. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कालीन महाराष्ट्रात अनेक वाईट रुढी परंपरा होत्या.
3. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कालीन स्त्रीयांना दुय्यम स्थान होते.
4. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कालीन जाती व्यवस्था, वर्णव्यवस्था होती.
5. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कालीन अस्पृशानां कुठलेही सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक अधिकार नव्हते.

**प्रारंभिक जीवन**

मध्यप्रदेशात महु या गावी असतानाचा तेथे भिमाबाईला 14 एप्रिल 1891 रोजी 14 वे आपत्य जलमास आले ते म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकर.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या समाज सुधारणा**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा मुळ पिंड हा समाजसुधाकराचा होता. आतापर्यंत स्वाता:हा आनंत सामाजिक समस्याचा अनुभव घेतला होता माझ्या सारखा उच्च विद्या विभुषित प्रस्थापित समाजाकडून हेटाळणी होत असेल. तर माझा आडाणी निरिक्षक असंघटित समाज बांधकाची काय दशा असले या विचारातून याला वाचा फोडण्यासाठी एखादे आपले विचाराचे वृत्तपत्र असावेत असे वाटू लागले करण वृत्तपत्र हे फार मोठे समाजप्रबोधनाचे व समाज जाग्रतीचे कार्य करित असताता. तेव्हा बाबासाहेब आंबेडकरांनी आपले सामाजिक कार्य मूकनायक वृत्तापत्रापत् चाले केले.

आंबेडकरकालीन महाराष्ट्रात सामाजिक स्थिती फार विषमतावादी होती.संपूर्ण समाज वर्णव्यवस्था. जातीव्यवस्था, धर्मपंथात वाटला होता. अस्पृश्यांना कुठलेही अधिकार नव्हते.स्त्रीयांचे दुय्यम स्थान होते.समाजात हजेरी प्रथा, वेढबिगारी, गुलामगिरी स्त्रीयांच्या बाबतीत वाईट स्ढी-परंपरा निर्माण झाल्या होत्या.

भारतीय समाजात जातीव्यवस्था हा अतिशय कलंकमय प्रकार दिसून येतो जातीव्यवस्था हा भारतीय समाजाचे वैशिष्टे आहे.आंबेडकराच्या मते भारताच्या प्रगतीमधील जात ही मानसिकता आहे.म्हणूनच त्यांनी Any Viligian of Cast या ग्रंथात जातीव्यवस्थेशी सविस्तर विचार मांडले आहेत. या ग्रंथात त्यांनी असे म्हटले आहे.जात घालवायची असेल तर आंतरजातीय विवाह शिवाय पर्याय नाही असे प्रखर मत मांडले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतातील जातीयता आणि त्याची जडणधडण व उगम. विकास या शोध विमा यात असे म्हटले की आर्य, हिंदु. द्रविड. मंगोलियन. सिंधीयन या लोकांना मिश्रणातुन हिंदु समाज निर्माण झाला आहे. पुढे विवाह पध्दतीत बदल होवून मात्र गोत्र व सहगोत्रला आलूयोग. प्रतिलागे. सवर्ण. असवर्ण. विवाह पध्दती अस्तित्वात येवून आपआपसात रोटी बोटी बंद झाला आपण एकाच रक्ताचे आहोत ही कल्पना अमान्य होत गेली सर्व घडत असताना या घटनेला मागे धर्मनिमीला व जातीयतेचा अधिक महत्त्व आले. म्हणून जोपर्यंत आंतरजातीय विवाह होणार नाही तोपर्यंत हा धर्मियता व जातीयता कमी होणार नाही.

डॉ.बाबासाहेब आंबेडकराच्या मते भारतीय जातीचा उच्च-निच्य भावना चिटकून बसली आहे.प्रत्येक व्यक्तीला जातीची मानसिकता झाली आहे.प्रत्येकाला आपली जात श्रेष्ठ वाटू लागली.म्हणूनच त्याने आपल्या मूकनायक पहिल्या अंकात मोहरा म्हटले आहे.एक जात म्हणजे मजला होय. आचार्य म्हणजे या मजल्याला शिडी

नाही याचा अर्थ एक मजल्यावहून दुसऱ्या मजल्यावर जाता येत नाही.विशेष म्हणजे या मजल्यावर हिंदु धर्मातील धर्मग्रंथाचे समर्थन आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना सामाजिक जिवनात वर्णव्यवस्था किंवा वर्णव्यवस्थेचा उगमाला कडाडुन विरोध केला.कारण प्रत्येक मानसाचा उगम नैसर्गिकच होत असतो.त्यामुळे कुठला मानुस बाहुतून तर कुठला मुकातून जन्मतो ही संकल्पना मान्य नाही.तसेच वर्णव्यवस्थेच्या नुसार जातीव्यवस्था मान्य नाही.(प्रत्येक माणुस निसर्गानुसार आपल्या आईच्या पोटी जन्मतो.)

22 मार्च 1920 रोजी माणगावं जिल्हा कोल्हापून येथे महाराष्ट्रातील अस्पृश वर्गाची परिषद भरली.परिषेदेचे अध्यक्षपद डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे होते तर प्रमुख वक्ते म्हणून स्वत: राजर्षि शाहू महाराज उपस्थित होते. या परिषदेत राजर्षीनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर हेच अस्पृश्यांचे डोळस नेत होऊ शकतात हे हेरले.त्यांनी उपस्थितांसमोर तुम्हाला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांसारखे परिपक्त नेतृत्व मिळाल्यामुळे मी निश्चित झालो आहे.असे समाधान व्यक्त केले.मुकनायक म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना मान्यता मिळत असतानाच त्यांना उच्च शिक्षणासाठी इग्लंडला जावे लागले.तेथेच डॉ.आंबेडकर 5 जुलै 1920 ते 3 एप्रिल 1923 पर्यंत होते.

समाज सुधारणेसाठी सभा व दलाची स्थापना

डॉ.बाबासाहेब आंबेडकर कालीन दलित समाज, अस्पृश्य समाज यांन कुठलेच अधिकार नव्हते त्यांना समाजापासुन बहिसकृत केले होते. त्यांना गावकुसाबाहेर राहत होते ते सर्व उपेक्षित, असंघटित होते.त्यांच्या हितासाठी आंबेडकरांनी 24 जुलै 1924 रोजी, बहिस्कृत हितकारणी सभा म्हणजेच बहिस्कृत केलेल्या समाजाची हित असणारी सभा.

समाज सुधारेणेसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेले सत्याग्रह

डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि भारतातील बहिस्कृत समाज यांच्या दृष्टिकोनातून 1927 हे वर्ष अत्यंत महत्वाचे आहे.कारण या वर्षी कोकण प्रदेशातील फुलावा जिह्यातील महाड या गावात पाण्याचा सत्यागृह आणि भारताचा सर्व प्रकारचा सामाजिक, धार्मिक विकृत्ती करण्याचे मूळ असणाऱ्या स्मृतीचे दहन यावर महाडचा सत्यागृह महत्वाचा मानला जातो. भारतात अस्पृश्यांना सार्वजनिक पाणवट्यावर पाणी भरण्याचा अधिकार नव्हता.अगोदर या संदर्भात आंदोलन झाले होते. 4 ऑगस्ट 1923 रोजी ब्राम्हत्तर पक्षाचे नेते शिकवले यांनी मुंबई येवून क्रांतीच्या मंडळात ठराव पास करून घेतला त्यानूसार सार्वजनिक पाणवटे, धर्मशाळा, विद्यालय वर्गाचा इत्यादी ठिकाणी अस्पृशता पाळू नये. या ठरावा नुसार महाराष्ट्र नगर पालिकेत 14 तळे अस्पृशांना खुले केले कोणत्याही अस्पृशांनी पाण्याला हात लावण्याची हिम्मत होत नव्हती.तेव्हा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी 19 मार्च 1927 रोजी हजारो अस्पृश्य स्त्री-पुरूषांना घेवून केले.तेव्हा तेथे सर्व समाजच माणसे कास घेवून या परिषदेस

धिंगाणा घातला.सर्वत्र आंदोलन सुरू झाले.144 वे कलम लागू केले.महाडच्या नगर परिषेदेने 14 तळे खुले करण्याचा ठराव रद्द केला.या घटनेवर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी विरोध केला.

महाडचा सत्यागृह ब्राम्हणांनी विचाराचा लोकांना फार मोठा विरोध केला.सभामंडपात येवून संपूर्ण उत्पन्न नाशवंत केले.दलित लोकांवर अन्याय अत्याचार केला.एवढेच नाही तर बाबासाहेबांवर लोक धावून गेली.ब्राम्हण आणि धर्मग्रंथ मनुस्मृती विचार कारणीभूत होते तेव्हा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी या घटनेचा निषेध म्हणून ब्राम्हणी निषेद असणारा ब्राम्हणी ग्रंथ 1927 ला मनुस्मृती दहन करण्यात आला.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर कालीन अस्पृशांना मंदिरात प्रवेश नव्हता.तेव्हा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृशांसाठी मंदिर प्रवेश चळवळ महत्वाची वाटली.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी नाशिक येथील काळाराम मंदिर प्रवेश चळवळ 30 मार्च 1930 ला चालू केली.नाशिकच्या जिल्हाधिकारी गार्डन याने 2 मार्च 1930 रोजी सुरतच्या कराराने मंदिर बंद केले.1 एप्रिलला बापू साहेब यांच्यासह सत्यागृहकांना अटक केले.15 एप्रिल 1932 रोजी रामनवमी होती.तेव्हा त्या ठिकाणी 144 कलम लागू झाले.

अमरावती येथील अंबादेवी मंदिर होते.त्या ठिकाणी देखील अस्पृशांना मंदिर प्रवेश नव्हता.या चळवळीत डॉ.पंजाबराव देशमुख सत्यागृह सुरू केला.चळवळीचे काही दिवसातच विस्तृत्व दादासाहेब खापरडे यांनी अस्पृशांना मंदिर खुले करून देण्याचे आश्वासन दिले.

पुणे येथील पार्वती टेकडीवरील पार्वती मंदिर अस्पृशांना खुले नव्हते.या चळवळीत अनेक पूर्वगामीक लोकांनी सहभाग घेतला.200 स्त्री-पुरूषांनी सहभाग घेतला.अशा प्रकारे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मंदिर सत्याग्रहाच्या चळवळी चालवल्या.1935 च्या येवला परिषदे नंतर मंदिर चळवळ कायमच्या बंद केल्या.कारण या परिषदेमध्ये त्यांनी धर्मांतराची घोषणा केली.

मध्ययुगीन काळात ग्रामीण भागात वेगवेगळे वतन दिले जात होते.अशाच प्रकारचे प्रत्येक गावांत महारकिचे वतन दिल्या जात होते.वतनाच्या मोबदल्यात सरकार कडून इनाम जमिन व रोख पगार व गावकऱ्यांकडून सुगी आल्यावर ठराविक धान्य दिले जात होते.या वतनाच्या मोबदल्यात गावातील प्रत्येक लोकांची रात्रदिवस काम करावे लागत असे.अशा वाईट पध्दतीला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी विरोध केला.त्यांनी 17 सप्टेंबर 1937 रोजी मुंबई विधान सभेत महार वतनदारीच्या बाबतीत काही सुचना केल्या.महारांचा पगार वतनदारांचा पगार सरकारी तिजोरीतून यावा त्यांच्या कामाची यादी निश्चित करावी.महारांच्या कडून दिलेली जमिन जिल्हाधिकाऱ्यांनी देण्यात ही चळवळ 1927 ला सुरूवात झाली.शेवटी 1958 रोजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाणांनी महार वतन कायदे रद्द केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्य निवारणांसाठी घेतलेल्या सभा

15 ऑक्टोंबर 1933 रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी औरंगाबाद जवळ माळीवाडा येथील चोखोबा साठे यांच्या विनंती वर बैठी सभा घेतली, येवला येथील सभा ही 1935 साली घेण्यात आली.त्यानंतर मुंबई इलाबा परिषद 1936 ला घेण्यात आली.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी चाळीसगांव तालुक्यातील मकरंदपुर येथे 30 डिसेंबर 1938 रोजी दलित परिषद आयोजित केली.मकरंदपूर परिषदेनंतर 23 फेब्रुवारी 1947 रोजी मराठवाड्यात ढोकी गावात महार, मांग, वतनदार परिषद घेतली.

समारोप

वरील सर्व घटकातून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक कार्य दिसून येते.सामाजिक कार्यामूळे महाराष्ट्रातील व संपूर्ण भारतातील दलित, अस्पृश्य यांच्यात जनजागृती करून त्यांच्यात पुरोगामी चळवळ निर्माण केली.या सर्व घटनांमुळे दलित, अस्पृश्य संघटित झाले व हक्कासाठी लढू लागले.

संदर्भ ग्रंथ

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आत्मचरित्र :- धनंजय कीर

२. पत्रकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर:- गंगाधर पानतावणे

३. मूक नायक व बहिष्कृत भारत:- महाराष्ट्र शासन

४. आंबेडकर चळवळीचा इतिहास:- अनिल शिंगारे

५. आंबेडकर चळवळीचा इतिहास:- अनिल कटारे

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani